समीर ॲप व प्रदूषण नियंत्रक मंडळाच्या वेबसाईटवरुन हवा गुणवत्ता विषयक अधिकृत माहिती घेण्याचे आवाहन

नवी मुंबई, दि. ७ (वार्ताहर) : नवी मुंबई शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने यापूर्वीच सन २०२४ मध्ये २७ मुद्दयांचा समावेश असलेली वायुप्रदूषण नियंत्रक मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्यात आली असून त्याचे निरीक्षण व अंमलबजावणी करीता विभागीय स्तरावर भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. या अनुषंगाने *डिसेंबर महिन्यात वायू प्रदूषणाला कारणीभूत ठरणा-या ४२ बांधकामांना नोटीसा बजावण्यात आल्या असून १९ बांधकाम साईट वरील कामे बंद करण्यात आलेली आहेत.*

हिवाळी कालावधीत वारा वाहण्याचे प्रमाण संथ असल्याने व वेगवान वा-याच्या अभावाने तसेच वातावरणात आर्द्रता असल्याने जमिनी लगतची प्रदूषके उंचीवरील हवेत मिसळण्याचे प्रमाण कमी होते, त्यामुळे हवेत धुरक्यासारखी (FOG) स्थिती असते. त्यामुळे नवी मुंबईत दरवर्षी हिवाळयाच्या कालावधीत वायू प्रदूषणात काही प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येते.

यावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेने यापूर्वीच सन २०२४ मध्ये २७ मुद्दयांचा समावेश असलेली वायुप्रदूषण नियंत्रक मार्गदर्शक तत्त्वे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जारी केली आहेत. त्या अनुषंगाने 'जीआरएपी - ४' अंतर्गत शहराच्या ज्या भागांमध्ये हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) २०० पेक्षा अधिक आढळला आहे अशा १९ ठिकाणांवर सुरु असलेली बांधकामे थांबविण्यात आलेली आहेत. बांधकाम ठिकाणांवरील प्रदूषण नियंत्रणाकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मानक कार्यप्रणाली (SOP) जारी केली असून त्यानुसार प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार *प्रत्येक बांधकाम स्थळी हवा गुणवत्ता मापक उपकरणे बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. आत्तापर्यंत ३० बांधकाम स्थळांवर ही उपकरणे बसविण्यात आली असून उर्वरित बांधकामांवर उपकरणे बसविण्याचे काम सुरु आहे. या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी याकरिता विभागीय स्तरावर संबंधित विभाग अधिकारी यांच्या अधिपत्याखाली स्थापत्य उपअभियंता , स्वच्छता अधिकारी/निरीक्षक, नगररचना उपअभियंता अशा अधिकाऱ्यांचे भरारी पथक गठीत करण्यात आले आहे. या भरारी पथकांमार्फत विभागीय क्षेत्रातील बांधकाम व निगडीत बाबींची तपासणी करण्यात येत असून या मध्ये वायू प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या ३२ बांधकाम स्थळांना सूचनापत्रे, १० बांधकाम स्थळांना कारणे दाखवा नोटीसा तसेच १९ बांधकामांना काम बंद नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे १७३ विकासकांना दंडात्मक नोटीसा जारी करण्यात आल्या आहेत.

याशिवाय प्रदूषणाला काही प्रमाणात कारणीभूत ठरणाऱ्या रस्त्यांच्या व पदपथांच्या कडेला साचलेली माती ब्रशव्दारे व मशिनव्दारे साफ करण्यात येत असून ती उचलून नेल्यानंतर प्रक्रियाकृत पाण्याने रस्ते धुवून घेण्यात येत आहेत. सध्या सानपाडयातील हवा गुणवत्ता निर्देशांक मोठया प्रमाणात वाढला असल्याचे वृत्त विविध माध्यमातून प्रसिध्द होताना निदर्शनास येत आहे. वास्तविकतः हवा गुणवत्ता निर्देशांकाची नोंद ही समीर ॲप आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रक मंडळाची वेबसाईट या अधिकृत माध्यमांतून घेतलेली असणे महत्वाचे आहे.

तथापि बहुतांशी वेळा ही माहिती त्रयस्थ संस्थांकडून पुरविल्या जाणाऱ्या लो कॉस्ट सेन्सर मॉडेल्स, क्राउड - सोर्स डेटा आधारित अनुमान किंवा उपग्रह आधारित अंदाज येथून घेतली जाते व त्यावर आधारित अंदाज व्यक्त केले जातात.

दौंड–काष्टी दुहेरीकरणासाठी वाहतूक ब्लॉक; सोलापूर विभागातील अनेक गाड्यांवर परिणाम

सोलापूर, दि. ७ (वार्ताहर): मध्य रेल्वेच्या दौंड–मनमाड विभागातील दौंड–काष्टी स्थानकांदरम्यान दुहेरीकरणाचे अत्यंत महत्त्वाचे काम हाती घेण्यात येत आहे. या कामासाठी नियोजित वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार असून याचा थेट परिणाम सोलापूर विभागातून धावणाऱ्या प्रवासी तसेच मेल–एक्सप्रेस गाड्यांवर होणार आहे. ४ जानेवारी २०२६ ते २५ जानेवारी २०२६ या कालावधीत टप्प्याटप्प्याने विविध गाड्या रद्द, वळविणे, पुनर्निर्धारित किंवा नियंत्रित करण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

दुहेरीकरणाच्या कामामुळे सोलापूर–दौंड डेमू स्पेशल, दौंड–सोलापूर डेमू स्पेशल, पुणे–सोलापूर इंटरसिटी एक्सप्रेस, सोलापूर–पुणे इंटरसिटी एक्सप्रेस यांसह हुतात्मा एक्सप्रेस, पुणे–सोलापूर एक्सप्रेस, पुणे–हरंगुळ स्पेशल, हडपसर–सोलापूर डेमू, पनवेल–नांदेड एक्स्प्रेस, निजामाबाद–पंढरपूर एक्स्प्रेस आदी अनेक गाड्या विविध तारखांना पूर्णपणे रद्द राहणार आहेत. काही गाड्या केवळ दोन दिवस रद्द राहतील, तर काही गाड्या संपूर्ण कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे या मार्गावरील दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे.

कामकाजादरम्यान काही दीर्घ पल्ल्याच्या गाड्या पर्यायी मार्गे वळविण्यात आल्या आहेत. तिरुवनंतपुरम–सीएसएमटी मुंबई एक्स्प्रेस आणि केएसआर बेंगळुरू–सीएसएमटी उद्यान एक्सप्रेस या गाड्या कुर्डुवाडी–मिरज–पुणे मार्गे धावणार आहेत. तर हुबळी–हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस ही गाडी सोलापूर–कुर्डुवाडी–लातूर–परळी वैजनाथ–परभणी–छत्रपती संभाजीनगर–मनमाड या लांबच्या पर्यायी मार्गावरून चालविण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवासाचा कालावधी वाढणार असून प्रवाशांनी त्यानुसार पूर्वनियोजन करण्याची गरज आहे.

याच कालावधीत अनेक गाड्यांचे वेळापत्रकही पुनर्निर्धारित करण्यात आले आहे. एलटीटी–विशाखापट्टणम एक्सप्रेसच्या गाड्या दोन तासांपासून ते साडेचार तासांपर्यंत उशिरा सुटतील. सीएसएमटी–बेंगळुरू उद्यान एक्सप्रेस, पुणे–भुवनेश्वर सुपरफास्ट, साईनगर शिर्डी–चेन्नई सेंट्रल साप्ताहिक एक्सप्रेस, अहमदाबाद–यशवंतपूर एक्सप्रेस तसेच हडपसर–काझीपेठ एक्सप्रेस या गाड्यांच्या सुटण्याच्या वेळेतही तासभर ते तीन–चार तासांपर्यंत बदल करण्यात आला आहे. याशिवाय नवी दिल्ली–बेंगळुरू कर्नाटक एक्सप्रेस ही गाडीही नियंत्रित करण्यात येणार आहे.

ऑस्ट्रेलियातील गोळीबाळासारखी घटना मुंबईत घडू शकते

बांगलादेशी घुसखोरीवरून भाजपचा इशारा

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) : मुंबईतील विविध भागांतील सार्वजनिक जमिनींवर योजनाबद्ध पद्धतीने अतिक्रमण केले जात आहे. बेकायदेशीर बांधकामे उभी करुन तेथे बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरांना वसविले जाते. त्यांना आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र मिळवून देण्यात मदत केली जाते. त्यामुळे त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट होतात आणि त्यांच्यामार्फत 'व्होट जिहाद' ही केला जातो, असा आरोप मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी बुधवारी केला आहे. बांगलादेशी व रोहिंग्यांच्या घुसखोरीमुळे मुंबईच्या सुरक्षेला धोका असून परिस्थिती नियंत्रणात आणली नाही, तर ऑस्ट्रेलियातील बाँडी बीच येथे झालेल्या सामूहिक गोळीबारासारख्या घटना मुंबईत गिरगाव चौपाटीवरही घडू शकतात, असा इशारा साटम यांनी दिला आहे.

मुंबईत एका विशिष्ट समुदायाकडून होत असलेल्या शांत लोकसंख्यात्मक व सांस्कृतिक आक्रमणाबाबत साटम यांनी चिंता व्यक्त केली. ही अतिक्रमणे, घुसखोरी आणि मतपेढीच्या राजकारणासाठी नियोजित कार्यपद्धती आहे. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्याने मुंबईत किती बांगलादेशी घुसखोरांना वसविले, असा सवाल साटम यांनी उपस्थित केला. मालवणी, मालाड, मानखुर्द, देवनार आणि कुर्ला या भागांमध्ये 'राजकीय आशीर्वादाने' लाखो बेकायदेशीर झोपडपट्ट्या उभ्या राहिल्या असल्याचा आरोप त्यांनी केला. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या अहवालाचा दाखला देत आमदार साटम यांनी मुंबईतील लोकसंख्यात्मक रचनेतील बदलांकडे लक्ष वेधले.

मतदान करणाऱ्यांना हॉटेल व प्रवासात विशेष सूट

विरार, दि. ७ (वार्ताहर) : मतदान करणाऱ्या नागरिकांना मतदानाच्या दिवशी मिळणार हॉटेल्स बिलांमध्ये व रिक्षा, बस भाड्यांमध्ये विशेष सूट वसई विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ कार्यक्रमाअंतर्गत दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. मा.आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढून मतदानाची टक्केवारी वाढावी तसेच मतदानाच्या दिवशी सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून मतदान करावे यादृष्टीने जनजागृती अभियानासोबतच विविध विशेष योजना राबविल्या जात आहेत. दि.०७ जानेवारी २०२६ रोजी आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व पुढाकाराने महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल्स असोसिएशन, रिक्षा युनियन तसेच मनपा परिवहन सेवा यांच्या पदाधिकाऱ्यांसोबत महानगरपालिका मुख्यालयात बैठक संपन्न झाली.

निवडणूक हा लोकशाहीचा एक उत्सव आहे, मतदानाच्या दिवशी सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून या उत्सवात मोठ्या प्रमाणात आपला सहभाग नोंदवावा या उद्देशाने वसई विरार शहर महानगरपालिका मतदानाच्या दिवशी मतदान करणाऱ्या मतदारांना हॉटेल्सच्या बिलांमध्ये, रिक्षा व बस प्रवासभाड्यामध्ये सूट देणेबाबत सदर बैठकीत मा.आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी मनोजकुमार सूर्यवंशी यांच्यामार्फत उपस्थित असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना आवाहन करण्यात आले.

मनपाच्या उपक्रमांमुळे मतदार टक्केवारी वाढणार : आयुक्त मनिषा खत्री

नाशिक, दि. ७ (वार्ताहर) : नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार जनजागृती अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत असून, या अभियानामुळे नाशिक शहरातील मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढेल, असा विश्वास नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांनी व्यक्त केला. या मतदार जनजागृती अभियानाच्या अनुषंगाने आज नाशिक महानगरपालिका व नाशिक पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस रेझिंग डे चे औचित्य साधून भव्य मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी स्वाक्षरी अभियान देखील राबविण्यात आले.

"वोट कर नाशिककर, कर मतदान, सांगतंय संविधान, – मतदान सर्वश्रेष्ठ दान" अशा घोषणांनी पोलीस परेड ग्राउंड दुमदुमून गेले. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रत्येक नाशिककराने जबाबदारीने मतदान करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी यावेळी केले. तर नाशिक महानगरपालिकेच्या वतीने जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी उपस्थितांना मतदार जनजागृतीची शपथ दिली. कार्यक्रमास पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त मोनिका राऊत, शरद काळे, नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी डॉ. मीता चौधरी यांच्यासह अनेक अधिकारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी नाशिक महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, अजित निकत तसेच विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

PUBLIC NOTICE

Public in General hereby informed that my client Mr. Ankit Shailesh Bheda, residing at 602, Samarth Shrushti, Unnat Nagar, M.G. Road, Opp. Azad Maidhan, Goregaon (West), Mumbai- 400 104.

That my client Mr. Ankit Shailesh Bheda is lawful owner of Shop No. 4, Shakti Apartments Co-op. Hsg. Soc., Sahakar Road, Jogeshwari (West), Mumbai- 400 102.

That Mr. Ankit Shailesh Bheda alongwith Smt. Sheetal Shailesh Bheda had acquired and purchased the said shop from Raminder Kaur A. Chawla by Sale and Transfer Deed dated 25/05/2002.

That Raminder Kaur A. Chawla had acquired and purchased the said shop from M/s. OMEX BUILDERS & CONTRACTORS by Articles of Agreement dated 29/12/1989 and the said original agreement has been lost and misplaced and same is not traceable till date for which my client Mr. Ankit Shailesh Bheda had lodged Lost Report bearing No. 171328-2025 dated 22/12/2025 before the Jogeshwari Police Station.

If any person/s claiming any right, title or claim in respect of aforementioned Original Agreement of Sale, should intimate me with relevant documents pertaining to the said Shop, within 14 days of publication of this Public Notice, failing which, it will be presumed that there is no right, or claim by anyone and the same has been waived.

Dated this 8th day of January, 2026

PRADEEP PANDEY
(Advocate High Court)
Office: 3rd Floor, Andheri Court Bar Association, Andheri East, Mumbai-400069

PUBLIC NOTICE

TAKE NOTICE that Mr.Kirit Sarvaiya alias Kirit Ramesh Sarvaiya and Mr.Ameet Sarvaiya alias Ameet Ramesh Sarvaiya is intending to sell industrial Unit situated at Unit No. 313, admeasuring 730 sq. ft. area, i.e. 67.84 sq. meter, on the 3rd Floor, at TV Industrial Estate, on Plot No. 248 (A), S. K. Ahire Marg, Worli, Mumbai- 400 030, of the Worli Estate of the Municipal Corporation of City of Mumbai Scheme No.52, C.S. No.1/1629 at the junction of Sudan Kalu Ahire Marg, and Worli Road, Mumbai 400030 free from all encumbrances to Mr.Zareer Dinshaw Colabavala.

Any person/s having any claim or right both inclusive and incidental to that of right to use and occupy said commercial Premises/Industrial Unit in respect of the said Premises/Unit or any part thereof by way of inheritances, share, sale, mortgage, lease, lien, license, charge, trust, maintenance, easement, gift, possession or encumbrance or otherwise howsoever is hereby required to intimate to the undersigned within 14 working days from the date of publication of this notice of such claim if any, with all supporting documents failing which the transaction shall be completed without reference to such claim and the claims, if any, of such person/s shall be treated as waived and not binding on our part

Dated this 8th January 2026 at Mumbai.

Sd/-
Mr.Zareer Dinshaw Colabavala
6-B Girnar Apartments, Nargis Dutt Road, Pali Hill,
Bandra (West) Mumbai 400050.
Mobile No.9833727972 mail id-captainzareer@gmail.com

BEFORE THE ARBITRATOR

(U/s. 84 of the Multi-State Co-operative Societies Act, 2002)
C/o Abhyudaya Co-op. Bank Ltd.
Regal Industrial Estate, Aacharya Donde Marg, Sewri, Mumbai-400015.

Sr. No	TO	IN
1.	**Mr. Bajpai Neelesh Subhash (Loanee)** A 106 Rudransh Bldg., Hanuman Tekdi Opp. Vevoor, Palghar East, Palghar 401404. **(Opponent No.1)**	**Mr. Bajpai Neelesh Subhash (Loanee) & Ors.** Case No.ARB/ASBL/94 of 2025
2.	**Mr. Bajpai Ashish Pratap (Guarantor)** 5/A, Prince Palace CHS Navali Road, Opp. Gharat Show Mill, Palghar East, Palghar 401404. **(Opponent No.3)**	

Whereas the **Apna Sahakari Bank Ltd.**, being the Disputants have referred to me the above disputes for decision. I hereby summon you to appear before me at the above address in person or by a pleader or by an Advocate duly instructed and able to answer all material questions relating to the Arbitration Case or such questions on the **14th January, 2026 at 11.00 a.m.** and further to answer the claim in the Arbitration Case in writing. Take notice that in default of your appearance on the day, time and place as mentioned hereinabove, the Arbitration Case will be heard and decided ex-parte.

Given under my hand and seal.
This 7th day of January, 2026.
Mumbai.
Seal
Sd/-
A. P. PAWAR
Arbitrator

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client states that **1) Mrs.Madhuben Dayabhai Parmar and 2) Mr. Jay Anilbhai Parmar** were jointly holding, Flat No. E-601, on the 6th floor, in the Building No.1 known as Nisarg Society known as **"NISARG HEAVEN CO-OP. HOUSING SOCIETY LIMITED"** situated at Mahavir Nagar, 90 feet Road, Kandivali West, Mumbai-400067 (hereinafter referred to as "the said flat") along with 5 (Five) fully paid shares of Rs. 50/- each bearing distinctive Nos. 421 to 425 (both inclusive) represented by Share Certificate No.85.

Mrs. Madhuben Dayabhai Parmar expired on 5-7-2021, leaving behind her the following legal heirs: **a) Mr. Anil Dayabhai Parmar** (Son), **b) Mrs. Reshma Deepak Chauhan** (NEE Reshma Dayabhai Parmar) (Married Daughter), **c) Mrs.Maya Dipak Darji** (NEE Maya Dayabhai Parmar) (Married Daughter), **d) Mrs.Harsha Nayan Parmar** (NEE Harsha Dayabhai Parmar) (Married Daughter) and **e) Mrs. Bhavika Vikram Jadav** (NEE Bhavika Dayabhai Parmar) (Married Daughter).

The aforementioned legal heirs have requested the society i.e **"NISARG HEAVEN CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED"** for transfer and release of their inherited shares in favour of **MR. ANIL DAYABHAI PARMAR** and have submitted transfer forms and registered release deed dated 3rd December, 2025 in the society office.

Any person or persons having any right, title or claim against the said flat and shares should send their claims in writing to the undersigned along with the documentary evidence in support of the said claim thereof within **15 days** of publication of the said Notice, failing which claims if any shall be deemed to have been waived.

Place:Mumbai,
Date: 8-1-2026.

Sd/-ANUJ Y. RAVAL-Advocate, High Court,
C-101, Anshul Heights CHSL, Near Kandivali Metro-Station, Off Link Road, Mahavir Nagar Extension, Kandivali (West), Mumbai-400067.
Contact: 7303170008, Email: camcons@gmail.com

Mahindra FINANCE

नोंदणीकृत कार्यालय : गेटवे बिल्डिंग, अपोलो बंदर, मुंबई- ४०० ००१.
कॉर्पोरेट ऑफिस येथे : बी विंग, तिसरा मजला, अगस्त्य कॉर्पोरेट पार्क, पिरामल अमिती बिल्डिंग, कमानी जंक्शन, कुर्ला पश्चिम मुंबई - ४०० ०७०.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना
(सरफेसी कायद्याच्या नियम ८(६) सह नियम ९(१) अंतर्गत वाचा)

वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटीजेशन आणि पुनर्बांधणी आणि सिक्युरिटी इंटरेस्टची अंमलबजावणी कायदा, २००२ (सरफेसी कायदा) अंतर्गत बँकेला आकारण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना, सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ (नियम) च्या नियम ८(६) सह वाचले जाते.

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि गहाणखतदारांना सूचना देण्यात येत आहे की, **महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (सुरक्षित कर्जदार/ एनबीएफसी)** कडे गहाण/चार्ज केलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्यांचा **ताबा** बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने सरफैसी कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत घेतला आहे, जो येथे तपशीलवार वाचला आहे, नियमांसह, खाली दिलेल्या ई–लिलाव वेळापत्रकानुसार बोली आमंत्रित करून नियमांच्या नियम ८ आणि ९ अंतर्गत येथे तपशीलवार सांगितल्याप्रमाणे बँकेच्या थकबाकी आणि व्याज वसूल करण्यासाठी **जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे, जे काही आहे आणि विना आश्रय आधारावर** या **तारखेला** विकल्या जातील :

पक्ष, थकबाकी आणि मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन

कर्जदार आणि गहाणखतदारांचे नाव	मागणी रक्कम, मागणी सूचना तारीख आणि ताबा सूचना तारीख	मालमत्ता तपासणीची तारीख आणि वेळ	कागदपत्रांसह बोली स्वीकारण्याची शेवटची तारीख	ई–लिलाव तारीख व वेळ	आरपी, इएमडी व बीआयए	प्राधिकृत अधिकारी नाव, संपर्क क्र. व ईमेल आयडी
१. राहुल दिनेश गोस्वामी (कर्जदार) २. पाटील कीर्ती नरसिंहा (सह–कर्जदार)	**मागणी रक्कम :** १० जून २०२५ रोजी **रु. १,०१,८९,१८९/–** (रुपये एक कोटी एक लाख एकोणनव्वद हजार व एकशे एकोणनव्वद मात्र) **१३(२) मागणी सूचना तारीख :** १०.०६.२०२५. **ताबा तारीख :** २३.०६.२०२५.	१२.०१.२०२६ ते १६.०१.२०२६ सकाळी ११:०० ते संध्याकाळी ५:०० दरम्यान	२७.०१.२०२६	**ई–लिलावाची तारीख :** २८.०१.२०२६ **ई–लिलाव वेळ :** १०.०० ते ४.००	**राखीव किंमत : रु. ७२,००,०००/–** (रु. बाहत्तर लाख फक्त) **इसारा रक्कम ठेव : रु. ७,२०,०००/–** (रु. सात लाख वीस हजार मात्र) **बोली वाढीव रक्कम : रु. ५०,०००/–** (रु. पन्नास हजार फक्त)	**श्री. आरिफ खान** +९१ ९८२२५४८४६४ ARIF.KHAN@mahindrafinance.com **श्री अनुरोध कुमार तिवारी** +९१ ९७५२००२२८१ ANURODH.TIWARI@mahindrafinance.com **श्री वरद भर्नुके** +९१ ८०९७१८५०४४ varad.bharnuke@mahindrafinance.com

मालमत्तेची माहिती – के. डी. कंपाउंड, लिंक रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई–४०००६७ येथे असलेल्या रूपारेल एलारा नावाच्या इमारतीत, तिसऱ्या मजल्यावरील, ४२९ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ असलेल्या फ्लॅट क्रमांक ३०१ चे सर्व तुकडे आणि पार्सल, १ कार पार्किंगची जागा.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया https://www.mahindrafinance.com/sme-loans/auction-notices येथे दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या किंवा अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधा आणि ई–लिलावाच्या मार्गदर्शनासाठी संपर्क व्यक्ती श्री. बालाजी मन्नूर, मोबाईल क्रमांक: ७९७७७०१०८०, ई–मेल–आयडी : Mannur.govindarajan@c1india.com

दिनांक : ०८.०१.२०२६ ठिकाण : कांदिवली, मुंबई
सही/– अधिकृत स्वाक्षरीकर्ता, महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

सार्वजनिक सूचना

येथे सूचना देण्यात येत आहे की मी **श्रीमती कल्पना सुरेश पंचसारा** आणि **श्रीमती अर्चना जगदीश पंचसारा** यांच्या मालकीची चौकशी करत आहे, **दोघांचाही पत्ता फ्लॅट क्रमांक १२०४, बी विंग, विश्वकर्मा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड, सी. एस. रोड, आनंद नगर, दहिसर (पूर्व), मुंबई –४०० ०६८ येथे आहे,** जे येथे लिहिलेल्या अनुसूचीमध्ये विशेषतः वर्णन केलेल्या मालमत्तेचे संयुक्त मालक असल्याचा दावा करत आहेत.

दिवंगत चतुर रामजी पंचसारा उर्फ चतुरभाई रामजी पंचसारा हे मूळतः छत्रपती शिवाजी रोड, आनंद नगर जवळ, दहिसर (पूर्व), मुंबई–४०० ०६८ येथे असलेल्या विश्वकर्मा नगर सहकारी गृहनिर्माण सोसायटी लिमिटेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमध्ये २३५ चौरस फूट कार्पेट एरिया असलेल्या **फ्लॅट क्रमांक बी – ४०६** चे हक्कदार होते. कायमस्वरूपी पर्यायी निवास करारानुसार, येथे लिहिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेले निवासी परिसर त्यांना **मेसर्स ससाकाश डेव्हलपर्स अँड बिल्डर्स** यांनी त्यात नमूद केलेल्या अटी आणि शर्तींवर वाटप केले.

स्वर्गीय चतुर रामजी पंचासरा उर्फ चतुरभाई रामजी पंचसरा यांचा २८ एप्रिल २०१६ रोजी मुंबई येथे मृत्यू झाला, पुढील कायदेशीर वारस आहेत :
१. श्रीमती. हिना नरेंद्र खंभैता – (मुलगी)
२. श्रीमती. ज्योती महेश सुरलिया – (मुलगी)
३. श्रीमती मनीषा रमेश जोलापुरा – (मुलगी)
४. स्वर्गीय सुरेश चतुरभाई पंचसरा – (पुत्र–मृत्यू)
५. स्वर्गीय जगदीश चतुरभाई पंचासरा – (मुलगा)

स्वर्गीय सुरेश चतुरभाई पंचासरा, दिवंगत चतुर रामजी पंचसरा उर्फ चतुरभाई रामजी पंचसरा यांचा मुलगा, त्यांच्या वडिलांचे आधी निधन झाले आणि २५ फेब्रुवारी २००८ रोजी त्यांचा मृत्यू झाला, त्यांचे कायदेशीर वारस उदा. श्रीमती कल्पना सुरेश पंचसरा, श्री देवल सुरेश पंचसरा आणि श्रीमती. निधी अंकित पाटकर.

स्वर्गीय जगदीश चतुरभाई पंचासरा, स्वर्गीय चतुर रामजी पंचसरा उर्फ चतुरभाई रामजी पंचसरा यांचा मुलगा, ३० एप्रिल २०२१ रोजी त्यांचा मृत्यू झाला, त्यांचे कायदेशीर वारस उदा. सौ अर्चना जगदीश पंचासरा आणि मिस दिशिता जगदीश पंचासरा.

४ जुलै २०२४ रोजीच्या सुटकेच्या करारद्वारे, स्वर्गीय चतुर रामजी पंचसारा उर्फ चतुरभाई रामजी पंचसारा यांच्या इतर सर्व कायदेशीर वारसांनी, ज्यामध्ये स्वर्गीय सुरेश चतुरभाई पंचसारा आणि **स्वर्गीय जगदीश चतुरभाई पंचसारा** यांच्या कायदेशीर वारसांचा समावेश आहे, त्यांनी येथे दिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेवरील त्यांचे सर्व संबंधित अधिकार, मालकी हक्क, हितसंबंध, हिस्सा, दावा आणि मागणी पूर्णपणे **श्रीमती कल्पना सुरेश पंचसारा आणि श्रीमती अर्चना जगदीश पंचसारा** यांच्या नावे सोडली आहे, त्याग केला आहे, आत्मसमर्पण केले आहे आणि कायमचे सोडून दिले आहे, जे आता तिचे पूर्ण आणि अनन्य संयुक्त मालक आहेत.

सदर **श्रीमती कल्पना सुरेश पंचसारा** आणि **श्रीमती अर्चना जगदीश पंचसारा** यांनी **श्री पराग किरीट संघवी** आणि **श्रीमती किंजल पराग संघवी** यांना लिहिलेल्या पत्राद्वारे येथे दिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मालमत्ता विकण्यास, हस्तांतरित करण्यास आणि हस्तांतरित करण्यास सहमती दर्शविली आहे आणि त्यांचा हेतू आहे.

ज्या सर्व व्यक्तींना सदर मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, हिस्सा, दावा किंवा मागणी आहे, मग ती विक्री, करार, गहाणखत, शुल्क, धारणाधिकार, भेटवस्तू, ताबा, वारसा, वारसाहक्क, हुकूम, आदेश, निवाडा किंवा इतर कोणत्याही प्रकारे असो, त्यांना याद्वारे कागदोपत्री पुराव्यांसह माझ्या कार्यालयातील अधोस्वाक्षरीकाराला म्हणजेच **ॲड. ख्याती वडगामा, १०२, रूपानी बाग, नंदा पाटकर रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७,** येथे १४ (चौदा) दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळवावे लागेल. जर सदर कालावधीत कोणताही दावा प्राप्त झाला नाही, तर असे गृहीत धरले जाईल की सदर मालमत्तेवर कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध किंवा आक्षेप नाही आणि प्रस्तावित व्यवहार अशा कोणत्याही दाव्याचा संदर्भ न घेता पूर्ण केला जाईल, जो माफ, सोडून आणि सोडून देण्यात आला आहे असे मानले जाईल. या सार्वजनिक सूचनेला सार्वजनिक सूचनेच्या स्वरूपात किंवा त्याद्वारे कोणतीही उत्तरे किंवा आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत किंवा स्वीकारले जाणार नाहीत.

वरील वेळापत्रक येथे संदर्भित केले आहे

मालकी हक्काच्या आधारावर **फ्लॅट क्रमांक १२०४** असलेली सर्व निवासी जागा, मुंबई शहर आणि मुंबई उपनगराच्या नोंदणी जिल्हा आणि उपजिल्ह्यांमध्ये, **सी. एस. रोड, आनंद नगर, दहिसर (पूर्व), मुंबई ४०० ०६८ येथे असलेल्या विश्वकर्मा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड या संस्थेच्या इमारतीच्या बी– विंगमध्ये १२ व्या मजल्यावर,** ४५५ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ आणि ३०५.५० चौरस फूट अतिरिक्त टेरेसह, मुंबई उपनगर जिल्ह्यातील तालुका बोरिवली, दहिसर गावाच्या सी. टी. एस. क्रमांक १२०६/सी जमिनीवर उभे असलेले, रु. चे ५ (पाच) पूर्णतः भरलेले शेअर्स जे १४ डिसेंबर १९७३ रोजी नोंदणी क्रमांक बीओएम/एचएसजी/४०७७ असलेल्या संस्थेने जारी केलेल्या शेअर सर्टिफिकेट क्रमांक **३७** अंतर्गत, **१८१ ते १८५** (दोन्ही समाविष्ट) असलेले प्रत्येकी ५०/– रुपये आहेत.

तारीख : ०८–०१–२०२६
ठिकाण : मुंबई
सही/–
(ॲड. ख्याती वडगामा)

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client **Mr. Girish Tukaram Shinde** is intending to purchase **Flat No. C-1-27, 3rd Floor**, in the building known as **"Anjana"**, of **Shree Mahalakshmi Co-Operative Housing Society Ltd.**